(असाधारण)

शनिवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०२२

अधिसूचना

क्र. - १८९/२०२२ दिनांक - १९.११.२०२२

विषय - अधिसभा, विद्या परीषद, अभ्यास मंडळ निवडणूक - २०२२
दोन ठिकाणी मतदार असलेल्या मतदारांसाठी विशेष सूचना

दिनांक २०.११.२०२२ रोजी होऊ घातलेल्या अधिसभा, विद्या परीषद आणि अभ्यास मंडळ निवडणूकीसाठी प्रसिद्ध झालेल्या अंतिम मतदार यादीनुसार सर्व मतदारांना त्यांना नेमून दिलेल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदानाचा हक्क बजावयाचा आहे. प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, संस्था चालक प्रतिनिधी हे जर स्वतः पंजीकृत पदवीधर म्हणूनही मतदार असतील तर त्यांनाही पदवीधर म्हणून मतदान करण्याचा हक्क आहे. असे निदर्शनास आले आहे की, या उल्लेखित मतदारांपैकी काही प्राचार्य, शिक्षक, संस्थाचालक प्रतिनिधी यांचे एका ठिकाणी तर याच मतदारापैकी काहीसाठी पंजीकृत पदवीधर म्हणून दुसऱ्या ठिकाणी मतदान केंद्र निश्चित झाले आहे. अशा सर्व मतदारांची गैरसोय होऊ नये म्हणून या सर्वांना एकाच ठिकाणी मतदान करू देण्याचा निर्णय मा.कुलगुरूंच्या विचाराधीन होता.

सर्व संबंधितांच्या माहितीकरीता याद्वारे अधिसूचित करण्यात येते की, मा.कुलगुरूंनी दिलेल्या निर्णयानुसार वर उल्लेखित मतदारांना त्यांचे प्राचार्य, शिक्षक, विद्यापीठ शिक्षक, संस्थाचालक प्रतिनिधी म्हणून ज्या मतदान केंद्रावर मतदान आहे त्याच मतदान केंद्रावर पंजीकृत पदवीधर म्हणूनही मतदान करण्याचा हक्क बहाल करण्यात येत आहे. यासाठी त्यांना सोबत जोडलेले घोषणा पत्र सादर करावे लागणार आहे. तसेच या मतदारांच्या पंजीकृत पदवीधर म्हणून असलेल्या मतपत्रिका मतपेटीत न टाकता स्वतंत्र लिफाफ्यात सिलबंद करण्यात येतील. मतमोजणीच्यावेळी याबाबत शहानिशा केल्यावरच या मतपत्रिका मतमोजणीसाठी ग्राह्य धरण्यात येईल.

स्वा./-
कुलसचिव तथा निर्वाचन अधिकारी
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

अधिसभा निवडणूक-२०२२

घोषणापत्र

मी, ---------- व माझा पंजीकृत पदवीधर मतदार अ.क्र. ----------या घोषणापत्राद्वारे निवेदन करतो की, माझे पंजीकृत पदवीधर म्हणून मतदान ----------ा मतदान केंद्रावर आहे. परंतु माझे प्राचार्य / शिक्षक / विद्यापीठ शिक्षक / संस्थाचालक प्रतिनिधी / अभ्यास मंडळ विभाग प्रमुख या मतदार संघात सुद्धा ---------- या मतदान केंद्रावर मतदान आहे. सबब, आपणांस विनंती की मला ---------- या मतदार संघात पंजीकृत पदवीधरचे मतदान करण्याची परवानगी द्यावी.

---------- या मतदान केंद्रावर जर माझ्या नावावर एखाद्याने पंजीकृत पदवीधर म्हणून मतदान केल्यास माझे ---------- या मतदान केंद्रावरील पदवीधर पंजीकृत पदवीधर म्हणून नोंदविलेले मतदान रद्द करण्यास माझी संमती आहे.

स्वाक्षरी -
नांव - (----------)